# प्रायोजक

मुख्य प्रायोजक

₹ १०,०००००

क्रिडा कार्यक्रम

₹ १,०००००

सह प्रायोजक

₹ ५,०००००

आरोग्य कार्यक्रम

₹ १,०००००

मशाल मॅरेथॉन प्रायोजक

₹ ५,०००००

पर्यावरण कार्यक्रम

₹ १,०००००

नैसर्गिक शेती मिशन

₹ ३,०००००

स्वच्छता कार्यक्रम

₹ १,०००००

सांस्कृतिक कार्यक्रम

₹ २,०००००

रानटी जनावरांपासून शेतीच्या संरक्षणाचे प्रदर्शन आणि चर्चा

₹ १,०००००

उद्योग कार्यक्रम

₹ २,०००००


## सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान

प्लॉट नं.१६०, नवनगर विकास प्राधिकरण,ओरोस, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, ४१६८१२

szkprediffmail.com  9422449018


**श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ, मुंबई**
**सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान, किर्लोस**
**कृषी विज्ञान केंद्र, किर्लोस**
**छत्रपती शिवाजी कृषी महाविद्यालय किर्लोस – ओरोस**
**जिजामाता फळ प्रक्रिया समुह (KVIC)**
**सैनिक फेडरेशन**



# आनंदोत्सव
## २०२४

१५ ते १९
फेब्रुवारी २०२४

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या ३५० व्या वर्षा निमित्ताने १५ ते १९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत 'आनंदोत्सव' साजरा करत आहोत. अनेक वर्षाच्या गुलामगिरीचा साखळदंड उध्वस्त करून भारतात एक नवीन पहाट उजाडली. शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले. असे स्वराज्य कि, जिथे सर्वांना आनंद मिळाला. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठाला देखील हात लावायचा नाही अशी सक्त ताकीद सैनिकांना त्यांनी दिली होती. त्यांनी अनेक सुविधा निर्माण केल्या आणि खऱ्या अर्थाने 'जय जवान जय किसान' हे राज्य निर्माण केले. महिलांसाठी सुरक्षा आणि न्यायाचे राज्य निर्माण केले. त्यामुळे हे राज्य प्रत्येकाचे आहे आणि हा राजा आमचा आहे ही भावना प्रत्येकाच्या मनात उमलली. आणि प्रत्येक व्यक्ती शिवरायांसाठी आणि स्वराज्यासाठी मरमिटायला तयार झाली. म्हणूनच शिवराय गेल्यानंतर सुद्धा २७ वर्षे संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि ताराराणी लढले आणि बलाढ्य औरंगजेबचा पराभव केला. शिवरायांचा आदर्श घेऊन सर्व लढले आणि अटकेपार झेंडा फडकवला. त्यातून आजचा समर्थ भारत निर्माण झाला. आजचा भारत शिवरायांच्या तत्त्वावर उभे करण्याचे काम आपल्या सर्वांना करायचे आहे. हा या आनंदोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. नैसर्गिक शेतीची अंमलबजावणी झाल्यानंतर समृद्ध आणि आनंदी गाव प्रकल्प आम्ही सुरू केला आहे. भारतातील प्रत्येक गाव समृद्ध आणि आनंदी असेल तर भारत समृद्ध आणि आनंदी होईल. या तत्त्वावर आनंदोत्सवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आनंदोत्सव छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेले स्वराज्य, डॉ. बाबा साहेब आंबेडकरांनी घटना बनवून नमूद केलेले आहे. हा आनंदोत्सव भविष्यामध्ये भारत समृद्ध आणि आनंदी करण्यासाठी आहे. त्यासाठी आम्ही विविध कार्यक्रम आयोजित करत आहोत. तरी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे आणि या कार्यक्रमात सहभागी व्हावे ही विनंती.

**ब्रिगे. सुधीर सावंत-माजी खासदार**
अध्यक्ष
सिंधुदुर्ग जिल्हा कृषी प्रतिष्ठान

# आनंदोत्सवाचे स्वरुप





## नैसर्गिक शेती

आजच्या भारतात सर्वात दु:खी समाज म्हणजे शेतकरी आहे. शिवरायांनी जसे प्राधान्य शेतकऱ्यांना दिले तसेच प्राधान्य आजच्या सरकारने दिले पाहिजे. म्हणूनच आम्ही नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले आहे. कृषी विज्ञान केंद्र सिंधुदुर्गने ७ वर्षे अथक प्रयत्न केले. त्यावेळी आम्हाला प्रचंड विरोध झाला. शेवटी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेकडे जाऊन आम्ही नैसर्गिक शेतीच्या मान्यतेची मागणी केली. त्यांनी निती आयोगाचे उपाध्यक्ष श्री. राजीव यांना पूर्ण माहिती घेण्यास सांगितले. त्यांनी पूर्ण माहिती घेऊन ती केंद्र सरकारला सादर केली. केंद्र सरकारने तात्काळ मंजुरी दिली. यावर्षी मुख्यमंत्री यांच्याकडे जाऊन डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियानाला मंजुरी घेतली. या अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक शेतीचे ५०० शेतकरी गट बनवून पूर्ण जिल्ह्यात नैसर्गिक शेती मिशनची अंमलबजावणी करण्यात येणार असून, येत्या ३ वर्षात १५,००० एकर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणण्याचे उद्दीष्ट आहे.

- नैसर्गिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देणे.
- नैसर्गिक शेती पध्दतीची प्रात्यक्षिके
- जैविक खते व जैविक किटकनाशकांची प्रात्यक्षिके
- नैसर्गिक शेतीचे प्रदर्शन व स्पर्धा

## आरोग्य

- न्युट्रिशन बाबत माहिती व प्रदर्शन
- मिलेट पाककला स्पर्धा
- मिलेट उत्पादनाची  पिक प्रात्यक्षिके
- योगा व खेळाचे महत्व



## उद्योग

- PMFME, CMEGP अंतर्गत उद्योगासाठी प्रशिक्षण.
- सरकारच्या सर्व कार्यक्रमांची माहिती देणे.
- बचत गट, उद्योजक इच्छुक असणाऱ्या लोकांचा अर्ज घेणे, निधी मंजूर करून घेणे.
- उद्योग व बाजारपेठ मिळविण्यासाठी मदत करणे.
- कौशल्य आधारित प्रशिक्षण देणे.



## सांस्कृतिक कार्यक्रम

छत्रपती शिवाजी महाराज ते ताराराणी कालखंड आधारित विविध कार्यक्रम. उदा. नाटक, पोवाडे, शायरी, गायन व नृत्य स्पर्धा, नाटक आणि चित्रपटात उत्कृष्ट काम केलेल्यांना पुरस्कार, दशावतार नाटक, डबलबारी स्पर्धा



## क्रिडा

३० ते ५० वर्ष
वयोगटातील महिलांची स्पर्धा
मशाल मॅरेथॉन
मुलांसाठी क्रिडा स्पर्धा



## पर्यावरण

ग्लोबल वॉर्मिंग कमी
करण्यासाठी
चित्रकला स्पर्धा



## स्वच्छता

आपले गाव
स्वच्छ गाव प्रदर्शन



## प्रदर्शन

ग्रामस्थांनी उत्पादित
केलेले नैसर्गिक शेती
मालाचे प्रदर्शन
पाककला स्पर्धा व प्रदर्शन



## वन्य प्राणी

रानटी जनावरांपासून
शेतीच्या संरक्षणाचे प्रदर्शन
आणि चर्चा